मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि.23 फेब्रुवारी 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड पुन्हा राज्यात अव्वल!

## 'माझी वसुंधरा 5.0'मध्ये सलग तिसऱ्यांदा प्रथम, राज्यपालांच्या हस्ते गौरव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावत सलग तिसऱ्यांदा अव्वल स्थान मिळविले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महापालिकेस १० कोटीचे बक्षिस जाहिर झाले असून आज राज्यस्तरीय आयोजीत सन्मान सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत व उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते महापौर रवि लांडगे व आयुक्त श्रावण हर्डीकर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज,महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात, १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रथम क्रमांक मिळवित सलग तिसऱ्यांदा राज्यात अव्वल येण्याची किमया साधली.

'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांवर आधारित विविध पर्यावरणीय निकषांवर शहरांची कामगिरी तपासण्यात आली. या निकषांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन, स्त्रोतस्थानी कचरा विलगीकरण, निर्माल्य पुनर्प्रक्रिया प्रकल्प, एकल-वापर प्लास्टिकमुक्त मोहीम, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, जलसंधारण उपक्रम, सौरऊर्जा वापर तसेच हरित पट्टा विस्तार या क्षेत्रांत प्रभावी अंमलबजावणी केली.

शहरातील पर्यावरणीय गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणताना प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला

> **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत सलग तिसऱ्यांदा राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे हा संपूर्ण पिंपरी चिंचवडकरांसाठी अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात शहराने सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि परिणामकारक कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. हे यश केवळ महापालिकेचे नसून शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या, नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा-महाविद्यालये, उद्योग क्षेत्र आणि सर्व घटकांच्या सक्रिय सहभागाचे फलित आहे.**
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> **शाश्वत विकासाच्या दिशेने शहराची वाटचाल अधिक वेगाने सुरू आहे. तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन, पारदर्शक अंमलबजावणी आणि जनसहभाग यांच्या माध्यमातून आम्ही पर्यावरणीय निकषांमध्ये उल्लेखनीय सुधारणा साधली आहे. भविष्यातही हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक शहर उभारण्याचा आमचा निर्धार कायम राहील.**
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

---

# इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठी महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत प्रदूषणास कारणीभूत कंपन्या व संस्थांवर कडक कारवाईचे दिले संकेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्या व संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असून पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही सामूहिक जबाबदारी स्वीकारून पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे,आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कु-हाडे, यांच्या उपस्थितीत सात मावळे संवर्धन संस्थेमार्फत इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश इंद्रायणी नदीतील वाढत्या प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधणे तसेच नदी स्वच्छतेसाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान महापौर लांडगे यांनी स्वतः इंद्रायणी नदीच्या पात्रात उतरून स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष पाहणी करताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा, औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा तसेच इतर घातक घटकांची त्यांनी पाहणी करून नदीच्या प्रदूषणामागील संभाव्य कारणांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणीनंतर महापौर लांडगे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून इंद्रायणी नदीत सोडण्यात येणारे प्रदूषित सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि पर्यावरणास हानिकारक घटक यांस जबाबदार असलेल्या संबंधित कंपन्या तसेच इतर संस्थांवर प्रशासनामार्फत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत दिले.

इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. याशिवाय या स्वच्छता अभियानामुळे नदी संवर्धनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलले गेले असून भविष्यात अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

या उपक्रमात सात मावळे संवर्धन संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंद्रायणी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या मोहिमांना भविष्यात अधिक गती तसेच प्रोत्साहन दिले जाईल असे देखील महापौर लांडगे यांनी यावेळी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ताकर वसुलीवरून खळबळ

## जप्ती व नळजोड तोड कारवाईवर नगरसेवकांचा आक्षेप; रेड झोनसाठी विशेष शिबिर घेण्याची सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदार मालमत्ताधारकांवर नोटिसा बजावून, महापालिकेकडून जप्तीची तसेच, नळजोड तोडण्याची कारवाई सुरू आहे. ती कारवाई नियमबाह्य असल्याचा आरोप करत, रेड झोन क्षेत्रातील मालमत्ताधारकांसाठी विशेष शिबिर घेऊन त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ द्यावा. तसेच, संपूर्ण शहरासाठी अभय योजना लागू करावी, अशी मागणी महापालिकेच्या विशेष सभेत नगरसेवकांनी केली

महापालिकेच्या करसंकलन विभागाला यंदाच्या वर्षी 1 हजार 500 कोटी रुपयांचे टार्गेट आहे. आत्तापर्यंत केवळ 725 कोटी रुपयांची वसुली झाली आहे. चालू आर्थिक वर्षांतील अखेरच्या फेब्रुवारी व मार्च महिन्यात कर संकलन विभागाकडून वसुली मोहिम तीव करण्यात आली आहे. त्या अंतर्गत थकबाकीदारांना नोटिसा बजावणे, मालमत्ता सील करणे, नळजोड तोडणे अशी कारवाई केली जात आहे. करसंकलन विभागाने ती कारवाई सध्या तीव केली आहे

त्यामुळे सभागृहात नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. रेड झोन क्षेत्रातील सर्व मालमत्तांच्या सामान्यकरात 50 टक्के सवलत 1 एप्रिल 2026 पासून देण्यात येणार आहे. त्या भागातील मालमत्तांना कर संकलन विभागाने नोटिसा बजावून, भरमसाट कर लावला आहे. त्यामुळे नागरिकांवर आर्थिक ताणामुळे त्रस्त झाले आहेत. तसे न करता मालमत्ताधारकांसाठी शिबिर आयोजित करून त्यांना कागदपत्रे सादर करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पंकज भालेकर यांनी केली. मालमत्ताकर न भरल्यास त्यावर मोठ्या प्रमाणात विलंब दंड लावला जात असल्याने नागरिक हैराण झाले आहेत, असे भाजपाचे कैलास कुटे म्हणाले. भाजपाचे संदीप कस्पटे म्हणाले की, मालमत्ता हस्तांतरणासाठी मालमत्ताच्या किमतीवर अर्धा टक्का शुल्क न लावता तो पूर्वीप्रमाणे 500 रुपये इतका करावा. भाजपाचे राहुल कलाटे यांनीही मालमत्ता हस्तांतरण शुल्क अधिक असल्याने तो पूर्वीच्या दराने आकारण्याची मागणी केली. तसेच, जप्ती तसेच, नळजोड तोडण्याची कठोर कारवाई न करता, बिल भरण्यासाठी अभय योजना राबवण्याची मागणी अनेक नगरसेवकांनी केली.



### जास्त बोलल्यास होतो कार्यक्रम

**» सभागृहात जास्त बोलल्यास कार्यक्रम होतो. तो सदस्य पुन्हा सभागृहात दिसत नाही, असे माजी महापौर राहुल जाधव हे भाऊसाहेब भोईर यांना उद्देशून म्हणाले. त्यावर भोईर यांनी जाधव यांचा समाचार घेतला. सभागृहात ताल व लय सोडून बोलू नका, असे म्हटल्याची आठवण करून दिली. सर्वांना बोलू द्यावे. महिन्यातून एक सभा होते. सर्व नगरसेवकांना व्यक्त होण्याची संधी द्यावी, अशी विनंती त्यांनी महापौरांना केली. त्यावर महापौर रवी लांडगे यांनी सभागृहात सत्ताधाऱ्यांसह विरोधकांना बोलण्याची समान संधी दिली जाईल. सभागृहाचे कामकाज पारदर्शकपणे चालविले जाईल, अशी ग्वाही दिली.**

### अभय योजनेबाबत विचार केला जाईल

**» थकबाकीदारांना मालमत्ताकराचे बिल करण्यासाठी अभय योजना लागू करण्याचा विचार केला जाईल. नागरिकांना अन्यायकारक बिले दिली गेली असल्यास ती सादर करावेत. त्यात दुरुस्ती करून योग्य दराने बिले देण्याची कार्यवाही केली जाईल, असे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्पष्ट केले.**

### श्रावण हर्डीकर यांना आयुक्तपदी नेमण्याची मागणी

**» तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांच्या नाशिक येथील कुंभमेळ्याच्या आयुक्तपदी बदली झाल्यानंतर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची महापालिकेच्या प्रभारी आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. त्यांची नियुक्ती केवळ महापालिका निवडणुकीपुरती करण्यात आली होती. तसेच, ते स्वत: महापालिकेत काम करण्यास उत्सुक नाहीत. मात्र, सभेत अनेक नगरसेवकांनी त्यांनी पुन्हा महापालिकेत आयुक्त म्हणून काम करावे, अशी मागणी केली.**

# चऱ्होलीतील भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्त करा

## महापालिकेच्या सभेत नगरसेवक सचिन तापकीर आक्रमक

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या.जवळच कचरा डेपो असल्यामुळे भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले असून, वस्तीमध्ये येऊन चावा घेण्याचे प्रमाण वाढले आहेय लवकरात-लवकर महापालिका प्रशासनाने यावर ठोस पावले उचलावी अशी सक्त ताकीद नगरसेवक सचिन तापकीर यांनी महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली.

नुकतीच शाळेच्या बसमधून उतरत असताना मुलांवर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना घडल्याचा उल्लेख करत, "शहरातील, माझ्या प्रभागातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळेच हा मुद्दा आज सभागृहात मांडला, निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत अनेक तक्रारी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भटक्या कुत्र्यांच्या चाव्यावरून मुद्दा गाजला. अनेक नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. भटक्या कुत्र्यांच्या समस्या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिक्षकांना संपर्क साधल्यास कुठलीही ठोस उपाययोजना करत नाहीत. उद्या गाडी पाठवतो असे सांगतात. नागरिकांना कुत्रे चावून गेल्यावर दोन दिवसांनी गाडी पाठवतो सांगणार, अन्यथा टोलवाटोलवी करणार असा प्रकार संबधित विभागातील अधिकाऱ्यांचा आहे. त्यामुळे प्रशासनाने ठोस पाऊले उचलून भटक्या कुत्र्यांबाबत निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली



# डायमंड रेसिडेन्सी परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

## सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर नागरिकांचा सवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्याचे दावे प्रशासन करत असले तरी, जमिनीवरची परिस्थिती मात्र वेगळीच असल्याचे पाहायला मिळत आहे. मोशी-प्राधिकरणातील सेक्टर ६, डायमंड रेसिडेन्सी परिसरात सध्या कचऱ्याचे मोठ्या प्रमाणावर साम्राज्य पसरले असून, यामुळे स्थानिक नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे, या परिसरात रस्ते झाडण्यासाठी कर्मचारी येतात, मात्र झाडलेला कचरा उचललाच जात नसल्याची गंभीर तक्रार स्थानिकांनी केली आहे.

परिसरातील नागरिकांनी समाजमाध्यमांवर फोटो प्रसिद्ध करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, सफाई कर्मचारी केवळ नावापुरते रस्ते झाडतात, पण तो कचरा पोत्यात भरून नेण्याऐवजी तिथेच ढीग करून ठेवला जातो. अनेक दिवसांपासून हा कचरा पडून असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भावही वाढला आहे."रोड झाडणारा कर्मचारी येतो, पण कचरा भरत नाही. मग प्रशासनाने त्यांना गाड्या केवळ फिरण्यासाठी दिल्या आहेत का?" असा सवाल स्थानिक नागरिक यांनी उपस्थित करत आहेत.

या कचऱ्यामध्ये झाडांच्या फांद्या, सुका कचरा आणि प्लास्टिकचा समावेश असून तो फुटपाथ आणि झाडांच्या आडोशाला तसाच पडून आहे. स्वच्छतेच्या नावाखाली केवळ सोपस्कार पार पाडले जात असल्याचा आरोप आता नागरिक करत आहेत. याचसोबत परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळेही नागरिक हैराण आहेत. महावितरणकडे तक्रार करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने रहिवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. तरी महापालिका प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन डायमंड रेसिडेन्सी परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट लावावी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.



# पुणेकरांनो पाणी जपून वापरा! जलसंपदा विभागाचा इशारा

## मंजूर कोट्यापेक्षा 8.84 टीएमसी अतिरिक्त पाणीवापर; दंडामुळे थकबाकीचा आकडा गेला 900 कोटींच्या पार.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरावर पाणी कपातीचे किंवा पाणीपुरवठा खंडित होण्याचे मोठे संकट ओढावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुणे महापालिकेने जलसंपदा विभागाची तब्बल ९३२ कोटी ८८ लाख रुपयांची पाणीपट्टी थकवली असून, ही रक्कम येत्या 15 दिवसांत न भरल्यास पाणीपुरवठा तात्काळ खंडित करण्यात येईल, असा गंभीर इशारा जलसंपदा विभाग दिला आहे.

पुणे शहरासाठी वर्षाला ११.६० टीएमसी पाणी मंजूर आहे. जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार, ३१ जानेवारीअखेर महापालिकेने ११.२३ टीएमसी पाण्याचा वापर पूर्ण केला आहे. आता केवळ ०.३६ टीएमसी पाणी शिल्लक असून, ते येत्या १२ ते १५ दिवसांत संपण्याची शक्यता आहे.

मंजूर कोटा संपल्यानंतर खडकवासला धरणातून पाणी उचलता येणार नाही, असे विभागाने महापालिकेला स्पष्ट शब्दांत कळवले आहे. महापालिकेकडे आतापर्यंत ९५२ कोटी ६२ लाख रुपयांची थकबाकी आहे. महापालिकेने नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यांच्या पाणीपट्टीपोटी १९ कोटी ७५ लाख रुपयांची रक्कम जलसंपदा विभागाकडे जमा केली आहे,

तरीदेखील फेब्रुवारीअखेर महापालिकेकडे ९३२ कोटी ८८ लाख रुपयांची थकबाकी असल्याचे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे. ही थकबाकी लवकर भरावी; अन्यथा मंजूर पाणी कोटा संपल्यानंतर तो तत्काळ खंडित करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या तरतुदीनुसार अतिरिक्त २५ टक्के पाणीवापर केल्यास दीडपट,तर त्यापेक्षा जास्त वापर केल्यास पाणी वापर दराच्या तीनपट दंड आकारला जातो. महापालिकेकडून २०१६ पासून अतिरिक्त पाणी वापर होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेला तरतुदीनुसार दंड आकारणी केली आहे.




### दंडाची आकारणी

» जलसंपदा विभागाच्या म्हणण्यानुसार महापालिकेने गेल्या वर्षी २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण वापराच्या ८.८४ टीएमसी अतिरिक्त पाणी वापर केला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या तरतुदीनुसार अतिरिक्त २५ टक्के पाणीवापर केल्यास दीडपट,तर त्यापेक्षा जास्त वापर केल्यास पाणी वापर दराच्या तीनपट दंड आकारला जातो. महापालिकेकडून २०१६ पासून अतिरिक्त पाणी वापर होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने महापालिकेला तरतुदीनुसार दंड आकारणी केली आहे.

### महत्त्वाचे मुद्दे

- » २०१६ पासूनची पाणीपट्टी आणि दंड मिळून एकूण ९३२.८८ कोटी रुपयांची थकबाकी
- » महापालिकेने मंजूर कोट्यापेक्षा ८.८४ टीएमसी जास्त पाण्याचा वापर
- » नियमानुसार, मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापरल्यास दराच्या तीनपट दंड
- » दंडामुळेच थकबाकीचा आकडा ९०० कोटींच्या पार

### पुणेकरांचे लक्ष महापालिकेकडे

» ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर एवढी मोठी थकबाकी भरणे किंवा पाण्याचे नियोजन करणे पालिकेसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. आता महापालिका प्रशासन यावर काय तोडगा काढते, याकडे सर्व पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# मुठा नदी प्रदूषणमुक्तीसाठी महापालिकेचा 'ट्रॅश बॅरिअर' निर्णय

## भिडे पुलाजवळील प्रयोग यशस्वी; संपूर्ण 44 किमी नदीपात्रात 10-12 ठिकाणी बॅरिअर बसविण्याची तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

शहराची जीवनरेखा असलेल्या मुठा नदीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी पुणे महानगरपालिका आता ठोस आणि तांत्रिक पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. नदीत तरंगणारा प्लास्टिक कचरा, प्लास्टिक बाटल्या, थर्माकोल आणि अन्य प्लास्टिक साहित्य अडविण्यासाठी नदीपात्रात 'ट्रॅश बॅरिअर' बसविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

बाबा भिडे पुलाजवळ एका खाजगी संस्थेने राबविलेल्या प्रयोगाला मिळालेल्या यशानंतर शहरातून वाहणाऱ्या सुमारे 44 किलोमीटरच्या मुठा नदीपात्रात विविध ठिकाणी असे बॅरिअर उभारण्याची योजना आखली जात आहे. यासाठी आगामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या उपायुक्त किशोरी शिंदे यांनी दिली. मुठा नदीत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा, चप्पल, शालेय पिशव्या, प्लास्टिक बाटल्या तसेच विविध घरगुती टाकाऊ वस्तू फेकल्या जात आहेत. धार्मिक श्रद्धेच्या नावाखाली पूजासाहित्य, देवतांच्या मूर्ती आणि नारळ थेट नदीत विसर्जित केले जातात. हा सर्व कचरा पाण्याच्या प्रवाहासोबत पुढे सरकत संपूर्ण नदी प्रदूषित करीत आहे. परिणामी नदीचे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या पर्यावरणाबाबतच्या सकारात्मक भूमिकेमुळे या उपक्रमासाठी आवश्यक निधीची तरतूद होईल, अशी पर्यावरणप्रेमींना अपेक्षा आहे.

बॅरिअरमध्ये साठलेला कचरा मशिन किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने सहज गोळा करता येतो आणि त्याची योग्य विल्हेवाट लावता येते. विशेष म्हणजे, पाण्यात सुमारे सहा फूट खोलीपर्यंत वाहणारा कचराही या प्रणालीद्वारे अडवता येतो.



### काय आहे 'ट्रॅश बॅरिअर'?

» ट्रॅश बॅरिअर म्हणजे नदीच्या पृष्ठभागावर बसविलेले तरंगते कुंपण. हे कुंपण नदीच्या प्रवाहात अशा प्रकारे बसविले जाते की पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित राहतो. मात्र, पृष्ठभागावर तरंगणारा प्लास्टिक, थर्माकोल, काचेच्या बाटल्या आणि इतर कचरा त्यात अडकतो. या बॅरिअरमध्ये साठलेला कचरा मशिन किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने सहज गोळा करता येतो आणि त्याची योग्य विल्हेवाट लावता येते. विशेष म्हणजे, पाण्यात सुमारे सहा फूट खोलीपर्यंत वाहणारा कचराही या प्रणालीद्वारे अडवता येतो.

### वर्शिप अर्थ फाउंडेशनचा प्रयोग यशस्वी

» नदीतील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'वर्शिप अर्थ फाउंडेशन'ने बाबा भिडे पुलाजवळ 'ट्रॅश बॅरिअर' बसविले. या उपक्रमामुळे चार महिन्यांत जमा होणारा कचरा आता अवघ्या एका आठवड्यात गोळा होत असल्याचे समोर आले आहे. दर आठवड्याला तीन ते चार मोठे डंपर ट्रक कचरा नदीतून बाहेर काढला जात असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक पराग मते यांनी दिली.

# बुलेट चालकांविरुद्ध कारवाई; फटाक्यासारखे आवाज करणारे सायलेंन्सर जप्त

## बुलेटच्या मॉडिफाय सायलेंसरवर पुणे पोलिसांचा बडगा; 348 बुलेट चालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

सायलेंन्सरमध्ये फेरफार करुन फटाक्यांसारखे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात ३४८ बुलेट चालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्या बुलेटला बसविण्यात आलेले सायलेन्सर जप्त करण्यात आले, पोलिसांनी बुलेट चालकांसह नियमभंग करणाऱ्या दुचाकी चालकांविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून १९ लाखांचा दंड वसूल करण्यात आला.

शहराच्या वेगवेगळ्या भागात विशेषत: उपनगरात भरधाव वेगात बुलेट चालक जातात. काही बुलेट चालक सायलेंन्सरमध्ये फेरफार (मॉडीफाय) करतात. अशा प्रकारचे फेरफार केल्यानंतर सायलेन्सरमधून फटाक्यासारखे आवाज येतात. रात्री अपरात्री अशा प्रकाराच्या आवाजाचा नागरिकांना त्रास होतो. विशेषत : ज्येष्ठ नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. वाहतूक पोलिसांकडून आठवडभरापासून बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली. विरुद्ध दिशेने जाणे, ट्रिपल सीट, तसेच विविध प्रकारचे नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. बेशिस्त दुचाकीस्वारांकडून एक कोटी रुपयांहून जास्त रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली आहे.

सायलेंन्सरमध्ये फेरफार करुन फटाक्यांसारखे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात ३४८ बुलेट चालकांविरुद्ध कारवाई केली. वाहतूक पोलिसांनी सायलेन्सरमध्ये फेरफार करुन फटाक्यासारखे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध कारवाई केली. पोलिसांनी दिवसभरात ३४८ बुलेट चालकांविरुद्ध कारवाई करुन सायलेंन्सर जागेवरच काढून टाकले. वाहतूक पोलिसांनी हे सायलेन्सर जप्त केले. बुलेट चालकांकडून तीन लाख ३४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. बेशिस्त दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी १४८ दुचाकी जप्त केल्या. पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांकडून १५ लाख ७३ हजार रुपयांचा दंड वसूल केला. वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी केले आहे.




### नियमभंगावर १९ लाखांचा दंड

» विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, ट्रिपल सीट, वेगमर्यादा भंग आदी प्रकारांवर विशेष मोहीम राबवण्यात आली. १४८ दुचाकी जप्त करण्यात आल्या असून एकूण १५ लाख ७३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. आठवडाभरातील कारवाईत एकत्रित दंडाची रक्कम १९ लाखांवर गेल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

### मद्यपी वाहनचालकां विरुद्ध कारवाई

» वाहतूक पोलिसांनी मद्य प्राशन करुन वाहने चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली. वाहतूक पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करुन ५३ मद्यपी वाहन चालकांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल केले. या प्रकरणात कारवाई करण्यात आलेल्या ४४ आरोपींना न्यायालयाने चार लाख २९ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला असून, त्यांच्याकडून त्वरीत दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

### ३४८ बुलेट चालकांवर कारवाई

» पुणे शहरात सायलेंसरमध्ये फेरफार करून फटाक्यासारखा आवाज करणाऱ्या ३४८ बुलेट चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. मॉडिफाय सायलेंसर जागेवरच काढून जप्त करण्यात आले. संबंधितांकडून सुमारे ३ लाख ३४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# शरद पवारांची प्रकृती पुन्हा बिघडली, पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल

## सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांना पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल केल्याची माहिती दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना पुन्हा एकदा पुण्यातल्या रूबी हॉल क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांची प्रकृती मागील आठवड्यात बिघडली होती त्यांना रुग्णालयात आणण्यात आलं होतं. पण चार दिवसांनी त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. आज शरद पवार यांना पुन्हा त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्यांना पुन्हा पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आली. शरद पवारांच्या कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत याबाबतची माहिती दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार पक्ष) अध्यक्ष शरद पवार यांना रविवारी सकाळी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्रकृती अस्वस्थ जाणवू लागल्याने त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले असून, पुढील दोन दिवस ते तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहणार आहेत.

रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य विश्वस्त डॉ. परवेझ ग्रँट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पवारांची रक्ताची चाचणी आणि सिटीस्कॅन करण्यात आले असून सर्व रिपोर्ट समाधानकारक (नॉर्मल) आहे.

सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून केवळ विश्रांती आणि पुढील उपचारांसाठी त्यांना रुग्णालयात ठेवण्यात आले आहे. यावेळी खासदार सुप्रिया सुळे देखील त्यांच्यासोबत रुग्णालयात उपस्थित आहेत.

काही दिवसांपूर्वी खोकल्याच्या त्रासामुळे शरद पवारांना बारामतीहून पुण्यात उपचारासाठी आणले होते. रुबी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करून ५ दिवसांनी डिस्चार्ज देण्यात आला होता. पुढील काही दिवस घरी विश्रांती घेण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला. शिवाय नियमित औषधोपचार सुरू ठेवण्याच्या सूचनाही डॉक्टरांनी दिल्या होत्या. परंतु आता पुन्हा शरद पवारांच्या प्रकृतीत बिघाड झाला आहे. त्यांना पुन्हा एकदा पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



### सुप्रिया सुळे यांची पोस्ट नेमकी काय?

» आम्ही बाबांना पुन्हा एकदा रुबी क्लिनिकमध्ये दाखल करत आहोत. त्यांच्या काही तपासण्या करण्यात येणार आहेत. तसंच त्यांना थोडा अशक्तपणा जाणवतो आहे आणि शरीरातील पाण्याची पातळी कमी झाली आहे. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे अशी माहिती सुप्रिया सुळेंनी पोस्ट केली आहे.